# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.क्रिडा समिती
## कार्यपत्रिका क्रमांक-१०
## सभावृत्तांत

दिनांक- ३/२/२०१०                                        वेळ- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ३/२/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.खेडकर घनशाम रामचंद्र - सभापती
२) मा.सुमनताई मधुकर पवळे
३) मा.आसवानी डब्बु
४) मा.थोरात एकनाथ दादा
५) मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
६) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
७) मा.जाधव विजया अशोक (मामी)

याशिवाय मा.चाकणकर-उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -

विषय क्रमांक- २) मनपाचे १० नंबर उद्यान, शाहू महाराज यांचे पुतळ्यामागे मोरवाडी येथील स्क्वॅश कोर्ट व व्यायामशाळा हे कर्तव्य फाऊंडेशन, चिंचवड, पुणे-३३ यांना सेवाशुल्क देऊन, ५ वर्षे करारने चालविणेस देणेबाबत-मा.विजया जाधव, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक- ३) श्री.संत ज्ञानेश्वरनगरी म्हाडा येथील भुखंड विविध खेळांचे क्रीडा सरावासाठी विकसित करणेकामी ब प्रभागांतर्गत सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रकात र.रू.२५,००,०००/- तरतूद मंजूर करणेबाबत-मा.प्रेमकुमार नायर, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) महापौर चषक हॉकी स्पर्धा (जिल्हास्तर) ऐवजी महापौर चषक शुटिंग व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करणेबाबत-मा.एकनाथ थोरात, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ५) पिंपरीगावातील मृनाल गार्डन शेजारील वॉर्ड क्र.७४ मधील बॉक्सिंग हॉल, व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत- मा.प्रेमकुमार नायर, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ६) मनपाच्या व्यायामशाळा करीता व्यायाम साहित्य वेळेत न पुरविल्याने मे.गिनिज स्पोर्टस्, पुणे-२६ यांचेवर आदेश रद्द केलेबाबतची कारवाई स्थगित व रद्द करून त्यांना उर्वरीत साहित्य पुरविणेची परवानगी देणेबाबत-मा.सुमनताई पवळे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर

शुक्रवार दिनांक ५/२/२०१० रोजी दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

मा.सभापती- शुक्रवार दि.५/२/२०१० रोजी दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

----------

[खेडकर घनशाम रामचंद्र]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १०
सभावृत्तांत
(दिनांक ३/२/२०१० ची तहकुब सभा)

दिनांक- ५/२/२०१० वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा समितीची दिनांक ३/२/२०१० ची तहकुब सभा शुक्रवार, दिनांक ५/२/२०१० रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.खेडकर घनशाम रामचंद्र - सभापती
२) मा.सुमनताई मधुकर पवळे
३) मा.थोरात एकनाथ दादा
४) मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
५) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
६) मा.जाधव विजया अशोक (मामी)

याशिवाय मा.कारचे-सहा.आयुक्त, मा.भंडारे-प्र.उपनगरसचिव, मा.पानसरे-क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------

दि.२०/१/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------

ठराव क्रमांक :- २५ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ५/२/२०१० विभाग - क्रिडा
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.सुमनताई पवळे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/ग्रं/कावि/६४०/०९दि.१८/११/०९
विषय :- मनपा जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामाचे दुस-या वर्षाचे दरांस मान्यता देणेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक :- २६ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ५/२/२०१०
सुचक :- मा.विजया जाधव अनुमोदक :-मा.राजेंद्र काटे
संदर्भ :- मा.विजया जाधव, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव..

मनपाचे १० नंबर उद्यान, शाहू महाराज यांचे पुतळ्यामागे मोरवाडी येथील स्क्वॅश कोर्ट व व्यायामशाळा सध्या मनपा मार्फत चालविले जात असून कर्तव्य फाऊंडेशन, चिंचवड, पुणे-३३ ही संस्था दरमहा र.रू.१०,०००/- मनपाकडून सेवाशुल्क घेऊन, ५ वर्षे कराराने चालविणेस घेणेस इच्छुक असल्याने मनपाचे १० नंबर उद्यान, शाहू महाराज यांचे पुतळ्यामागे मोरवाडी येथील स्क्वॅश कोर्ट व व्यायामशाळा हे कर्तव्य फाऊंडेशन, चिंचवड, पुणे-३३ या संस्थेस दरमहा र.रू.१०,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन ५ वर्षे कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेकामी कामी मा.स्थायी समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २७ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ५/२/२०१०
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.राजेंद्र काटे
संदर्भ :- मा.प्रेमकुमार नायर, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...

श्री.संत ज्ञानेश्वरनगरी म्हाडा येथील भुखंड क्षेत्र ३३६९.१३ चौ.मी. पुणे गृहनिर्माण महामंडळ (म्हाडा) कडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे विकसीत करणेसाठी हस्तांतर केले असून सदर भुखंडावर विविध खेळांचे क्रीडा सरावासाठी मैदान व्यायामशाळा तयार करण्याचे नियोजन असल्याने श्री.संत ज्ञानेश्वरनगरी म्हाडा येथील भुखंड क्षेत्र ३३६९.१३ चौ.मी. पुणे गृहनिर्माण महामंडळ (म्हाडा) कडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे विकसीत करणेसाठी हस्तांतर केल्याने, क्रीडा मैदाने व व्यायामशाळा तयार करणेकामी ब प्रभागांतर्गत सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रकात र.रू. २५,००,०००/- ची तरतूद करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २८ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ५/२/२०१०
सुचक :- मा.एकनाथ थोरात अनुमोदक :-मा.सुमनताई पवळे
संदर्भ :- मा.एकनाथ थोरात, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव...

मा.क्रीडा समिती मार्फत मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१०४५१ दि.२७/१/१० अन्वये महापौर चषक ७ विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी र.रू. १४,७८,५५०/- चे खर्चास मान्यता दिलेली असून यामध्ये महापौर चषक जिल्हास्तर हॉकी स्पर्धेचा समावेश आहे. त्याऐवजी शुटींग व्हॉलीबॉल जिल्हास्तर स्पर्धा आयोजित

करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २९ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ५/२/२०१०
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.राजेंद्र काटे
संदर्भ :- मा.प्रेमकुमार नायर, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची पिंपरीगांवातील मृनाल गार्डन शेजारील वॉर्ड क्र.७४ येथील बॉक्सिंग हॉल, व्यायामशाळा ही व्यायामशाळा ५ (पाच) वर्षे कालावधीसाठी दरमहा सेवाशुल्क र.रू.२,०००/- च्या (बॉक्सिंग हॉल व व्यायामशाळा) भाडेतत्वावर अमर कापसे युवा मंच पिंपरी चिंचवड या संस्थेस मनपाच्या अटी शर्तीनुसार चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३० विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ५/२/२०१०
सुचक :- मा.सुमनताई पवळे अनुमोदक :- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ :- मा.सुमनताई पवळे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव.

मनपच्या व्यायामशाळांकरिता (१७) व्यायाम साहित्य पुरविणेकामी र.रू. २४,८०,०५३/- चे कामाचे आदेश मे.गिनिज स्पोर्टस, पुणे-२६ यांना दिले होते. मे.गिनिज स्पोर्टस यांनी फेब्रु.०९ ते ऑक्टोंबर ०९ या काळात एकूण १० व्यायामशाळांकरीता एकूण र.रू.१६ लाखाचे साहित्य पुरविले आहे. इतरही व्यायामशाळांत व्यायाम साहित्य तयार करण्याचे कामकाज त्यांचेमार्फत चालू होते. परंतू व्यायाम साहित्य विहित वेळेत न पुरविल्याने मा.आयुक्त यांनी आदेश क्र.क्रिडा/८/कावि/५६३/२००९ दि.२८/१०/०९ अन्वये मनपाचे व्यायामशाळांकरीता व्यायाम साहित्य पुरविणेकामी कामाचे आदेश देऊनही व्यायामसाहित्य वेळेत न पुरविले बाबत अनामत रक्कम जप्त करून कामाचे आदेश रद्द करण्याची कारवाई केली आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. क्रिडा/५/कावि/३५८/२००९ दि.१९/११/०९ अन्वये नि.नो.क्र.४/२००८-०९ कुस्ती मॅट वेळेत न पुरविलेबाबत व नि.नो.क्र.३/२००७-०८ व्यायामशाळेकरीता व्यायाम साहित्य वेळेत न पुरविलेबाबत मे.गिनिज स्पोर्टस पुणे-२६ यांना पुढील ३ वर्षे कालावधीसाठी कामाची निविदा न देणेच्या कारवाई करणेस व निविदा भरणेस अपात्र समजणेस ही कारवाई केली आहे. मे.गिनिज स्पोर्टस यांनी क्रीडा विभागाकडे विनंती अर्ज केला असून ते १५ मार्च २०१० पर्यंत उर्वरित व्यायाम साहित्य पुरविण्याचे मान्य केले आहे. तरी वरील सर्व परिस्थितीचा विचार करून मे.गिनिज स्पोर्टस यांना एकवेळ संधी देऊन त्यांचेवर १)आदेश क्र. क्रिडा/७/कावि/५६३/२००९ दि.२८/१०/०९ २)आदेश क्र. क्रिडा/५/कावि/३५८/२००९ दि.१९/११/०९ अन्वये केलेली कारवाई स्थगित, रद्द करून त्यांना दिलेल्या कामाचे आदेशातील उर्वरीत व्यायाम साहित्य मनपा व्यायामशाळांकरीता

पुरविणेस मुदतवाढ देऊन व्यायामसाहित्य पुरविण्याची परवानगी देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[खेडकर घनशाम रामचंद्र]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/२२६/२०१०
दिनांक :- ६/२/२०१०

सही/-
प्र.उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.